ePaper

## गुप्त पद्धतीने आणि गनिमी काव्याने पार्थ पवारांचा प्रचार चालू : अजित पवार



| वर्ष - 7 | अंक - 302 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 21 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- रोहित शेकहँड करायला गेला
- मी माफी मागणार नाही
- आता न्यायालयाची ईडीला चपराक
- क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा

## महापालिका प्रशासन आता आक्रमक

# मिळकतकर थकबाकीदारांना 'अल्टीमेटम'!

### » तीन दिवसांची मुदत...अन्यथा नळ कनेक्शन तोडणार!

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने कर वसुलीसाठी धडाकेबाज निर्णय घेतले जात आहे. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महापालिका सोसायटीमधील सदनिकाधारक थकबाकीदाराचे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित करण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे सोसायटीमधील थकबाकीदारांनी आपला थकीत मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.**






महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाला १ हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत तब्बल ८६० कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. मात्र, एक हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. आता या प्रयत्नांना उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे आणखी बळ मिळाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील उर्वरित ११ दिवसांत जास्तीत जास्त कर वसूल करण्याचे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत.

महाराष्ट्र शासन, वसई विरार महापालिकेसह इतरांविरोधात विरोधात २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. १५ फेब्रुवारीला उच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे. न्यायालयाच्या निर्णयाची प्रत पिंपरी-चिंचवड महापालिकेला नुकतीच प्राप्त झाली आहे. यापूर्वीही महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने थकबाकीदाराचे सोसायटीमधील नळ कनेक्शन खंडित करण्याबाबत पत्र दिले होते. त्यानुसार शहरातील काही मोठ्या सोसायट्यांमधील नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहेत.

उच्च न्यायालयात महापालिका मालमत्ता करासाठी नळ कनेक्शन खंडित करू शकते की नाही? या संदर्भात ही याचिका दाखल होती. या याचिकेच्या सुनावणीवेळी न्यायालयाने मालमत्ता धारक कर भरण्यास नकार देत असतील तर ही चिंतेची बाब असल्याचे महत्व पूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. कर न भरता मालमत्ता धारकांना महापालिकेच्या सेवा सुविधा हव्या असतील तर आम्ही वसई विरार महापालिकेला थकबाकी वसूल करण्यासाठी कायद्याने जे काही नियम आहेत, ते वापरण्यापासून आम्ही प्रतिबंध घालणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

शहरात अशा अनेक सोसायट्या आहेत ज्यामध्ये हजारो सदनिकाधारकांकडे थकबाकी आहे. मात्र, संबंधित सोसायटीमधील काही सदनिका धारकांनी मालमत्ता कर, पाणीपट्टी भरलेली असते.

### थकबाकीदारांची यादी सोसायटी बोर्डावर प्रकाशित होणार

**» थकबाकीदार सोसायट्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत आणि थकबाकीदारांची यादी संबंधित सोसायटीच्या व्हॉटसअॅप ग्रुपवर तसेच नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यासाठी महापालिकेमार्फत सांगण्यात येणार आहे. सोसायटीमधील थकबाकीदाराचे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित करण्यासाठी तीन दिवसांची लेखी मुदत दिली जाणार आहे. त्यामुळे सोसायटीमधील पदाधिकाऱ्यांनी थकबाकीदारांच्या ही बाब निदर्शनास आणून द्यावी. त्यानंतरही नळ कनेक्शन खंडित न केल्यास महापालिकेच्या पथकामार्फत नळ कनेक्शन खंडित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.**

" मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय नुकताच प्राप्त झाला आहे. गट वर्षी पालिकेने काही सोसायट्यामध्ये अंतर्गत नळ कनेक्शन खंडित केलेलेही होते. मात्र आता उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने संबंधित थकबाकीदार याचे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई विधिग्राह्य ठरवली आहे. त्यामुळे उद्यापासून याची कडक अंमलबजावणी केली जाईल. तसे आदेश कर संकलन विभागाला देण्यात आले आहेत.

**–शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

## मुकाई चौक ते किवळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर खोदकाम

### » ठेकेदारावर भारतीय दंड विधान संहिता कलम 283, 188 नुसार गुन्हा दाखल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

**पिंपरी-चिंचवड शहरात प्रशस्त रस्ते असूनही जागोजागी वाहतूक कोंडी अशी स्थिती असून, यात विनापरवाना खड्डे खोदणाऱ्या लोकांमुळे भर पडत आहे. त्यामुळे आता वाहतूक पोलिसांकडून परवानगी न घेता खड्डे करून कोंडीत भर घालणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. मुकाई चौक ते किवळे गावाकडे जाणाऱ्या रोडवर खोदकाम करणारे मेसर्स लिपारू इन्फ्रा लिमिटेड या कंपनीचे फारुक खान, रा. साईनाथ नगर, निगडी यांच्यावर वाहतूक विभागाची परवानगी न घेता सार्वजनिक रस्त्यावर वाहनांना अडथळा होईल अशा प्रकारे खोदकाम केले म्हणून भारतीय दंड विधान संहिता कलम २८३, १८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव ही औद्योगिक क्षेत्र तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्र आहेत. तसेच जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचे देहू व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे आळंदी क्षेत्र देखील पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आहे. त्यामुळे या भागात वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच एमआयडीसी आणि आयटी पार्क हिंजवडीमुळे शहरात वाहनांची मोठी वर्दळ असते. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी शासनाकडून वाहतूक विभागासाठी स्वतंत्र उपायुक्त पद मंजूर करून घेतले आहे. तसेच वाहतूक विभागासाठी दोन सहायक आयुक्त यांची नियुक्ती केली आहे.

मात्र, स्मार्ट सिटी योजनेनुसार महापालिकेकडून रस्ते विकसित केले जात आहेत. परिणामी रस्ते अरुंद झाले असून, फुटपाथ मोठे झाले आहेत. कोंडीत भर पडण्यास हे देखील मोठे कारण आहे.

**" ना-हरकतपत्र दिल्यानंतर खोदकाम करताना वाहतूक विभागाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन ठेकेदार करत नसल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. तसेच वाहतूक शाखेकडून परवानगी घेण्यापूर्वीच खोदकाम केले जात असल्याचे वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास येत आहे. त्यामुळे आता गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे.**

**–विशाल गायकवाड,** पोलीस उपायुक्त.

# राज्यातील डाळिंबाच्या बागा अडचणीत?

## पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत आला आहे. दरवर्षी अंबिया बहरात सरासरी ५० हजार हेक्टरवर फळे घेतली जातात. पाण्याअभावी यंदाच्या अंबिया बहरात जेमतेम २५ हजार हेक्टरवर फळे घेतली जाणार आहेत. उन्हाळाभर पाणी मिळण्याची शाश्वती नसल्यामुळे शेतकरी डाळिंबाचे पीक घेणे टाळत आहेत.**

अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे म्हणाले, राज्यभरात डाळिंबाचे क्षेत्र २.६५ लाख हेक्टरवर आहे. मृग, हस्त आणि अंबिया बहारात डाळिंबाचे उत्पादन घेतले जाते. सध्या बाजारात हस्त बहरातील डाळिंबाची खरेदी- विक्री सुरू असून, हस्त बहार अंतिम टप्प्यात आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या (फळ धारणा) साधारण पंधरा डिसेंबरपासून मार्चच्या मध्यापर्यंत होतात. फळांची काढणी जूनपासून ऑगस्टपर्यंत होते.अंबिया बहरात प्रामुख्याने पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत फळे घेतली जातात. दरवर्षी साधारण ५० हजार हेक्टर फळे घेतली जातात. पण, यंदा पाण्याची मोठी टंचाई जाणवत असल्यामुळे जेमतेम २५ हजार हेक्टरवरच फळ छाटणी घेणे शक्य झाले आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या पूर्ण झाल्या आहेत. फळ छाटण्या झालेल्या बागांमध्ये फूल धारणा आणि फळ धारणा सुरू आहे. वाढते तापमान आणि पाणी कमी पडत असल्यामुळे फळ धारणा कमी होऊ लागली आहे. पाणी टंचाई आणि वाढत्या तापमानामुळे फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे. सोलापूर परिसरात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसवर गेले आहे. तापमान वाढ अशीच होत राहिल्यास



इंदापूर, सांगोला आणि सोलापूर परिसरातील डाळिंब पिकाला मोठा फटका बसण्याची भीती आहे. सांगोला येथील डाळिंब उत्पादक शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, पुणे, नगर जिल्ह्याच्या तुलनेत सांगोला आणि सोलापूर परिसरात अंबिया बहरात कमी क्षेत्रावर फळे घेतली जातात. सांगोला तालुक्यात सिंचनाची सोय नसलेल्या भागात पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. हा हंगाम उन्हाळाभर असतो. तापमान जास्त असल्यामुळे या काळात पाण्याची गरजही जास्त भासते. यंदा डाळिंबाना उन्हाळाभर पाणी पुरेल, अशी स्थिती नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अंबिया बहारात फळे घेणे टाळून जूनमध्ये मृग बहरात फळे घेण्याचे नियोजन केले आहे.अंबिया बहरात पाणी कमी पडण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी फळ छाटण्या (फळधारणा) घेणे टाळले आहे. मृग बहारात फळधारणा क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे फळधारणा कमी होण्याची आणि फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी दिली आहे.अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे म्हणाले, राज्यभरात डाळिंबाचे क्षेत्र २.६५ लाख हेक्टरवर आहे. मृग, हस्त आणि अंबिया बहारात डाळिंबाचे उत्पादन

### मोठा फटका बसण्याची भीती

» .सांगोला येथील डाळिंब उत्पादक शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, पुणे, नगर जिल्ह्याच्या तुलनेत सांगोला आणि सोलापूर परिसरात अंबिया बहरात कमी क्षेत्रावर फळे घेतली जातात. सांगोला तालुक्यात सिंचनाची सोय नसलेल्या भागात पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. हा हंगाम उन्हाळाभर असतो. तापमान जास्त असल्यामुळे या काळात पाण्याची गरजही जास्त भासते. यंदा डाळिंबाना उन्हाळाभर पाणी पुरेल, अशी स्थिती नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अंबिया बहारात फळे घेणे टाळून जूनमध्ये मृग बहरात फळे घेण्याचे नियोजन केले आहे.अंबिया बहरात पाणी कमी पडण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी फळ छाटण्या (फळधारणा) घेणे टाळले आहे. मृग बहारात फळधारणा क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे फळधारणा कमी होण्याची आणि फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी दिली आहे.

घेतले जाते. सध्या बाजारात हस्त बहरातील डाळिंबाची खरेदी- विक्री सुरू असून, हस्त बहार अंतिम टप्प्यात आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या (फळ धारणा) साधारण पंधरा डिसेंबरपासून मार्चच्या मध्यापर्यंत होतात. फळांची काढणी जूनपासून ऑगस्टपर्यंत होते.अंबिया बहरात प्रामुख्याने पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत फळे घेतली जातात. दरवर्षी साधारण ५० हजार हेक्टर फळे घेतली जातात. पण, यंदा पाण्याची मोठी टंचाई जाणवत असल्यामुळे जेमतेम २५ हजार हेक्टरवरच फळ छाटणी घेणे शक्य झाले आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या पूर्ण झाल्या आहेत. फळ छाटण्या झालेल्या बागांमध्ये फूल धारणा आणि फळ धारणा सुरू आहे. वाढते तापमान आणि पाणी कमी पडत असल्यामुळे फळ धारणा कमी होऊ लागली आहे.

# जुन्या गोष्टी न विसरण्याची शिवतारेंचे थोपटेंना आवाहन

## या भेटीमुळे बारामती लोकसभेच्या राजकारणात नवा रंग

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पवार यांचे ऐकेकाळचे राजकीय वैरी थोपटे यांची बुधवारी भेट घेतली. जुन्या गोष्टी विसरू नका, साथ द्या, असे आवाहन शिवतारे यांनी केले. या भेटीमुळे लोकसभेच्या राजकारणात नवा रंग भरला आहे.**





थोपटे कुटुंबिया काय भूमिका घेतात, याबाबतही उत्सुकता असून निवडणूक लढविण्याच्या निर्णयावर शिवतारे ठाम असल्याने बारामतीची निवडणूक तिरंगी होणार असल्याचे दिसत आहे. बारामती लोकसभा मतदारसंघ हा कुणाचा सातबारा नाही. गेली ५० वर्षे आम्ही तुम्हाला निवडून देतो आहे. 'तू कसा निवडून येतोस तेच पाहतो', असे म्हणणाऱ्या अजित पवारांचा बदला घेण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटत बारामती लोकसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केली होती. त्यामुळे महायुतीमध्ये वाद सुरू झाले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिवतारे यांना शांत राहण्याची सूचना केली होती. मात्र त्यानंतरही शिवतारे निवडणूक लढविण्यावर ठाम असून त्यांनी बुधवारी पवार यांचे कट्टर राजकीय वैरी माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची भेट घेतली. त्यामुळे या भेटीची चर्चा बारामतीच्या राजकारणात सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पवार कुटुंबियांसाठी बारामतीची लढत प्रतिष्ठेची झाली आहे. बारामतीची लढत विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा अशी होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यानुसार काही दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार यांनी माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची भेट घेतली होती. तर शरद पवार यांच्या उपस्थितीत सुळे यांच्यासाठी भोर येथे मेळावा झाला होता. त्यानंतर शिवतारे यांनी थोपटे यांची भेट घेतल्याने थोपटे कुटुंबियांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पवार यांचे ऐकेकाळचे राजकीय वैरी थोपटे यांची बुधवारी भेट घेतली.

### आम्हीही आरे ला कारे करू शकतो

» बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पवार यांचे ऐकेकाळचे राजकीय वैरी थोपटे यांची बुधवारी भेट घेतली. 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विजय शिवतारे यांना आवाहन केले आहे. ऐकायचे की नाही, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. आम्हीही आरे ला कारे करू शकतो. महायुतीमधील वातावरण खराब न करता आम्हाला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. कायदा सुव्यवस्था ठेवून निवडणूक पार पाडायच्या आहेत.

# माजी आमदार विलास लांडेंचा स्वाभिमान दुखावला!

## शिरुरमधून शिवाजीराव आढळराव पाटलांची उमेदवारी निश्चित : उमेदवारीसाठी तीव्र दावेदार लांडे समर्थकांमध्ये मोठी नाराजी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभा मतदार संघातून अजित पवार यांचे समर्थक माजी आमदार विलास लांडे तीव्र इच्छुक होते. मात्र, तरीही शिवसेनेतील (शिंदे गट) आयात उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादीच्या तिकीटावर उमेदवारी देण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे या मतदार संघातून उमेदवारीसाठी आग्रही असलेले विलास लांडे आणि समर्थकांचा स्वाभिमान दुखावला आहे. विशेष म्हणजे, आगामी विधानसभा निवडणुकीत लांडे वेगळा विचार करतील, असा दावा केला जात आहे.**






पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादीचा बलाढ्य नेता अशी विलास लांडे यांची ओळख आहे. शरद पवार यांच्याशी निष्ठा आणि अजित पवारांचे समर्थक असा राजकीय समतोल त्यांनी साधला होता. काही दिवसांपूर्वी त्यांनी शरद पवार यांच्यासोबत व्यासपीठावर हजेरी लावली होती. तसेच, अजित पवार यांच्या दौऱ्यातही लांडे अग्रभागी पहायला मिळतात. नगरसेवक, महापौर ते आमदार असा राजकीय प्रवास केलेले लांडे शहरातील सर्वात अनुभवी आणि मुरब्बी नेते आहेत.

२००९ मध्ये विलास लांडे यांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या विरोधात शिरुर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली होती. त्यानंतर २०१४ मध्ये राष्ट्रवादीने देवदत्त निकम यांना उमेदवारी दिली होती. २०१९ मध्ये पुन्हा लांडे यांनी मतदार संघात दौरे-बैठका वाढवल्या होत्या. पण, अजित पवार यांनी डॉ. अमोल कोल्हे यांच्या गळ्यात उमेदवरीची माळ घातली. त्यानंतर विधान परिषद निवडणुकीच्या वेळीसुद्धा लांडे यांना माघार घेण्याची सूचना करण्यात आली. राजकीय पटलावर प्रचंड ताकद असतानाही लांडे यांनी अजित पवार यांचा 'शब्द' प्रमाण मानला आणि समजुतीने घेतले आहे. दरम्यान, २०२४ च्या आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या माध्यमातून विलास लांडे यांनी आपण इच्छुक आहोत, असे जाहीरपणे सांगितले होते. तसेच, महायुती धर्माचे पालन करीत भोसरीचे आमदार आणि लांडे यांचे कट्टर प्रतिस्पर्धी महेश लांडगे यांच्याशीही जुळवून घेण्याची तयारी दर्शवली होती. "महायुतीच्या माध्यमातून महेश लांडगे यांना उमेदवारी द्या... आम्ही एकजुटीने काम करू..." असा दावाही त्यांनी केला होता. असे असतानाही लांडे यांच्या उमेदवारीबाबत अजित पवार यांनी सकारात्मक विचार केला नाही.

### विलास लांडे अन् समर्थक विरोधाचा फटका...

» भोसरीसह खेड, जुन्नर आणि आंबेगाव परिसरात माजी आमदार विलास लांडे यांचा मोठा जनसंपर्क आहे. त्याला नाती-गोती आणि पै-पाहुण्याचा आधार आहे. २०१४ पासून १० वर्षे लांडे सत्तेत नाहीत. असे असतानाही अजित पवार यांच्याकडून लांडे यांना शिरुरच्या उमेदवारीबाबत 'हातावर तुरी' दिल्या आहेत. त्यामुळे लांडे समर्थकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. भोसरी विधानसभा मतदार संघात लांडे यांचे किमान ४५ ते ५० मतदान हक्काचे आहे. याहून शिक्षण संस्था, औद्योगिक संस्थांमध्ये ३ हजाराहून अधिक कर्मचारी कामगार आहेत. त्यामुळे किमान ६० हजार मतांवर लांडे यांचा प्रभाव राहणार आहे. त्यामुळे शिवाजीराव आढळराव पाटील यांना उमेदवारी मिळाली, तरी विलास लांडे आणि समर्थकांच्या विरोधाचा मोठा फटका महायुतीला बसणार आहे.

याउलट, शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादीतूनच विरोध होता. दिलीप मोहिते पाटील यांनी जाहीरपणे त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाला विरोध केला. तसेच, राष्ट्रवादीचे मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचाही आढळराव यांच्या प्रवेशाला अप्रत्यक्ष विरोध आहे. यामध्ये मोहिते-पाटील आणि वळसे-पाटील यांच्याशी समझोता करण्यात अजित पवार यशस्वी झाले. त्यामुळे मोहिते-पाटील यांनी तडजोड करुन पुढे जाण्याची तयारी दर्शवली आहे. पण, विलास लांडे यांना विश्वासात घेतल्याशिवाय आढळराव पाटील यांचा विजय सोपा होणार नाही, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# मावळमध्ये संजोग वाघेरे यांच्या विजयासाठी पूर्ण ताकद लावू!

## » राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला विश्वास..!

### उरण, पनवेल, कर्जत-खालापूर विधानसभेच्या बैठकीत सविस्तर चर्चा

।पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उरण, पनवेल, कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांनी सविस्तर चर्चा केली. त्यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघतील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार म्हणून संजोग वाघेरे पाटील यांच्या विजयासाठी ताकद लावू, असा विश्वास सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी दिला.**



कर्जत येथे पार पडलेल्या या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) रायगडचे प्रभारी प्रशांत पाटील, महिला आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, रायगड जिल्हा अध्यक्ष अतुल पाटील, महिला अध्यक्ष दीपिका भांडारकर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सूरदास गोवारी, राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) पनवेल जिल्हा अध्यक्ष सतीश पाटील, महारष्ट्र प्रदेश सरचिटणीस फारुख पटेल, युवक अध्यक्ष शाहबाज पटेल यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशात काँग्रेस नेते राहूल गांधी, तर महाराष्ट्रात शरदचंद्र पवार साहेब आणि उध्दव ठाकरे साहेब समविचारी पक्ष, संघटना यांना सोबत घेऊन भाजपविरोधात लढा देत आहेत. त्यांची ताकद वाढविण्यासाठी, तसेच महाराष्ट्राच्या हितासाठी आगामी लोकसभा निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. त्या करिता इंडिया आघाडीचे उमेदवार म्हणून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजोग वाघेरे पाटील यांचे नाव आणि मशाल हे चिन्ह मतदारापर्यंत पोहोचविण्याचे काम करू. त्यांना मावळमध्ये विजयी करण्यासाठी आमचा संपूर्ण पक्षाची ताकद त्यांच्या पाठिशी उभा करू, असे प्रमुख पदाधिका-यांनी नमूद केले.

### कर्जत-खालापूरमध्ये गावोगावाठी संजोग वाघेरेंचे जोरदार स्वागत..!

» गाव भेट दौ-यादरम्यान संजोग वाघेरे पाटील यांनी कर्जत-खालापूर, तसेच उरण व पनवेल विधानसभेतील अनेक गावांना भेट दिली आहे. या दौ-यात ठिकठिकाणी माता-भगिनींकडून औक्षण करून, तर तरुणांकडून फटाक्यांच्या आतिशबाजीने जोरदार स्वागत होत आहे. मतदारांकडून त्यांना विजयासाठी आशिर्वाद दिला जात आहे. संजोग वाघेरे पाटील महिला, ज्येष्ठ नागरिकर, युवा वर्गाच्या भेटीगाठी घेत त्यांची आपुलकीने आणि आदराने विचारपूस केली. मावळचा खासदार उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याच शिवसेनेचा होणार, अशी प्रचिती सर्वच ठिकाणी येत आहे.




# ‘मावळत्या लोकसभेत’ला महाराष्ट्र!

**येणाऱ्या १८ व्या लोकसभा निवडणुकीचं वातावरण गडद होत चाललं आहे. १७ व्या लोकसभेचा, तिथल्या महाराष्ट्रातल्या खासदारांच्या कामकाजाचा आढावा घेण्याची ही वेळ. गेल्या पाच वर्षांतल्या लोकसभेच्या कामकाजाकडे पाहिल्यास काय दिसतं?**

गंभीर गुन्हेगारी खटले दाखल असलेल्या सदस्यांची संख्या आजवर सर्वाधिक, अधिवेशनांचा कालावधी, विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची संख्या, सभागृहातल्या चर्चाचा अवकाश कमी करत नेणं, विधेयकांना दिली जाणारी झटपट संमती, विरोधकांना वारंवार बाहेरचा रस्ता दाखवला जाणं, संविधानाच्या अनुच्छेद ९३ ला फाटा देत संपूर्ण कार्यकाळात लोकसभा उपाध्यक्षांची निवडच न करणं, सदनातलं वृत्तांकन करण्यास पत्रकारांना पुरेशी मोकळीक नसणं हे सारं म्हणजे नागरिकांसाठी धोक्याची घंटा आहे.लोकसभेच्या ५४३ जागांपैकी महाराष्ट्राच्या ४८ जागा, उत्तर प्रदेशच्या ८० जागांच्या खालोखाल आहेत. १७ व्या लोकसभेत महाराष्ट्रातल्या एकूण ४८ जागांपैकी भाजप २३, तेव्हाचा शिवसेना पक्ष १८, तेव्हाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ४, काँग्रेस १, एमआयएम १ तर अपक्ष १ असा जनादेश महाराष्ट्राने दिला होता. १७ व्या लोकसभेसाठी राज्यातून सर्वाधिक खासदार पाठवले भाजपने. भाजप-शिवसेना या दोन पक्षांनी १७ वी लोकसभा एकत्र लढवली. मात्र, त्याच वर्षी झालेल्या



विधानसभा निवडणुकीनंतर युती तोडली. नंतरही राजकीय सत्तानाट्याचे अंक राज्यात सुरूच राहिले. संसद म्हणजे कपट-कुरघोडीच्या राजकारणाचा मंच असल्याचंच अलीकडे दिसत असलं तरी, वास्तवात लोकांचा, प्रत्येक समाजसमूहाचा काळजीपूर्वक विचार करत देशाची ध्येयधोरणं ठरवणारं ते सर्वोच्च ठिकाण आहे, हे आपण मतदारांनी विसरायला नको. २०२० मध्ये जगभरातच, अकल्पित अशा कोविड संकटामुळे धोरणकर्त्यांपुढे आव्हान उभं ठाकलं. जागतिक आरोग्य संघटनेने ११ मार्च २० रोजी कोविड-१९ ला जागतिक महामारीचा दर्जा दिला, तेव्हा संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होतं. त्यात, लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये कोविडसंबंधी, आरोग्यापासून ते त्याच्या रोजगारावरील परिणामांपर्यंत, एकूण ८४ प्रश्नांवर चर्चा झाली होती. अधिवेशन आवरतं घेऊन अनियमित काळापर्यंत तहकूब करण्याचा निर्णय संसदेत २३ मार्च २० रोजी घेण्यात आला. अधिवेशन २ एप्रिल २० पर्यंत चालणं अपेक्षित होतं. अन्य देशांत तेथील संसदेमध्ये इंटरनेटच्या मदतीने, तर काही ठिकाणी शारीरिक अंतर राखण्याची बंधनं पाळून अधिवेशनं घेतली गेली. भारतात मात्र, संसद आणि बहुतेक राज्य विधिमंडळांनी कोविडकाळात कामकाज बंद ठेवलं.१७ व्या लोकसभेच्या पाच वर्षांमध्ये, जून २०१९ ते फेब्रुवारी २०२४ या काळात १५ अधिवेशनांमध्ये एकूण २७४ बैठका झाल्या. एकूण १,३५४ तास कामकाज सुरळीतपणे पार पडलं. लोकसभेच्या पाच वर्षांच्या मुदतीत किमान ४६८ बैठका व्हायला हव्यात, असा संसदीय संकेत आहे. १७ व्या लोकसभेत एकूण २७४ बैठका (१,३५४ तास) झाल्या. १६ व्या लोकसभेतल्या बैठकांची संख्या ३३१ (१,६१५ तास) होती. कोविडमुळे अधिवेशनांचा कालावधी कमी झाला, असं गृहीत धरलं तरी, अधिवेशनांच्या बैठका आणि बैठकांमध्ये चर्चाच न होण्याने कामकाजाचे तास कमी-कमी होत चाललेत. १६ व्या लोकसभेत महाराष्ट्रातील ४८ सदस्यांनी देशातून सर्वाधिक म्हणजे सरासरी प्रत्येकी ५३४ प्रश्न उपस्थित केले होते. १७ व्या लोकसभेसाठी प्रश्नांची सरासरी प्रत्येकी ३०९ होती. म्हणजे मागच्या लोकसभेच्या तुलनेत महाराष्ट्रातल्या सदस्यांची प्रश्नांची सरासरी संख्या प्रत्येकी २२५ ने कमी झाली. २०१९ ते २०२३ या काळात अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पावरच्या चर्चेसाठी अत्यल्प वेळ दिला गेला. २०२३ चं अर्थसंकल्पीय विधेयक तर विनाचर्चा संमत केलं गेलं. जम्मू – काश्मीर पुनर्गठन विधेयक २०१९ आणि महिला आरक्षण विधेयक २०२३ अवघ्या दोन दिवसांत मंजूर करण्यात आलं. पाच वर्षांच्या संसदेच्या संपूर्ण कार्यकाळात ३५ टक्के विधेयकं एक तासापेक्षा कमी वेळ चर्चा होऊन मंजूर झाली.

१७ व्या लोकसभेत एकूण ४,६६३ तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आले. यापैकी १,११६ प्रश्नांना (२३.९३%) तोंडी उत्तरं देण्यात आली. तर ५५,८८९ अतारांकित प्रश्नांना लेखी उत्तरं देण्यात आली. एकूण १५ अधिवेशनांत तारांकित आणि अतारांकित मिळून एकूण ६०,५५२ प्रश्न उपस्थित केले गेले.

## संपादकीय »

### डबे प्रवासी की..

***प्रवासाची वेळ जवळ आली की रेल्वेच्या यार्डात बराच काळ उभे करून ठेवलेले डबे एकमेकांना जोडण्याचे काम सुरू केले जाते.***

प्रवासाची वेळ जवळ आली की रेल्वेच्या यार्डात बराच काळ उभे करून ठेवलेले डबे एकमेकांना जोडण्याचे काम सुरू केले जाते.राजकीय चित्र हे असे रेल्वे स्थानकाचे स्मरण करून देणारे आहे. रेल्वे स्थानक आणि हे राजकीय चित्र यातील एक साम्य आणि एक फरक तेवढा नमूद करायला हवा. साम्य असे की रेल्वेच्या यार्डात बराच काळ दुर्लक्षित राहिलेल्या डब्यांप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांस स्वतःस कोणत्या ‘इंजिना’स जोडून घ्यावयाचे हे ठरवण्याचा अधिकार नाही. यातील एका गाडीचे दोन चालक दिल्ली-स्थित असून ईडी-पिडी, केंद्रीय गुन्हा अन्वेषण यंत्रणा आदी ‘रिमोट कंट्रोलां’च्या साहाय्याने यातील अनेक डबे एकाच भगव्या रंगाच्या गाडीस कसे जोडले जातील; याचे अव्याहत प्रयत्न त्यांच्याकडून सुरू आहेत. ही गाडी अतिजलद मानली जाते आणि तिच्या चालकांचे सामर्थ्य लक्षात घेता तिला अखंड ‘हिरवा कंदील’ मिळत राहील याचीही व्यवस्था आहे.

‘हेरगिरी, कट, परकीय शक्तींचा हस्तक्षेप, घुसखोरी या सर्वांपासून स्थानिक जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी कडक सुरक्षा कायदा संमत करण्यात येत आहे. देशद्रोह आणि उठावासाठी प्रसंगी आजीवन कारावासाची शिक्षा होऊ शकते’.. हाँगकाँगमधील बीजिंगधार्जिण्या सरकारने मंगळवारी संमत केलेल्या सुरक्षा कायद्याचा बोलविता धनी कोण?

# हाँगकाँगची गळचेपी..कायदेशीर मार्गांनी!

हे सांगायची गरज नाहीच. एके काळी चीनने या जागतिक वित्तीय केंद्रनगरीला स्वायत्तता बहाल करून तिचे जागतिक स्वरूप कायम राखले होते. पण क्षी जिनपिंग यांच्या अमदानीतील ‘नवीन चीन’ला जवळपास सगळीकडे शत्रूच दिसतात आणि लोकशाही मूल्ये म्हणजे देशाच्या विकासातील आणि विस्तारातील अडथळे वाटतात. यासाठीच कोणत्याही प्रकारच्या मतभिन्नतेला चिरडण्यासाठी वाटेल ते केले जाते. या दडपशाहीलाही कायद्याचे अधिष्ठान लागते. ते या कायद्याच्या निमित्ताने हाँगकाँग सरकारला आणि त्यांच्या चीनमधील पोशिंद्यांना लाभले आहे. ‘नॅशनल सिक्युरिटी लॉ’ नामे हा कायदा सर्वप्रथम २००३ मध्ये आणण्याचे प्रयत्न झाले, त्या वेळी हाँगकाँगमध्ये प्रचंड निदर्शने झाली. अनेक उच्चपदस्थांनी राजीनामे दिले होते. १९९७ मध्ये ब्रिटनकडून चीनच्या ताब्यात आल्यानंतर सहाच वर्षांनी चीनकडून असा कायदा आणण्याचे



प्रयत्न झाले, जे त्या वेळी हाँगकाँमधील नागरिक आणि जागृत उच्चपदस्थांनीही हाणून पाडले. त्या निदर्शनांची तीव्रता इतकी होती, की त्यामुळे नंतर अनेक वर्षे चीन किंवा हाँगकाँगमधील राजकीय नेत्यांनी, प्रशासनांनी हा विषयच काढला नाही.पण आज परिस्थिती वेगळी आहे. विस्तारवादी आणि नवसांस्कृतिकवादी क्षी जिनपिंग चीनचे शासक आहेत. त्यांना सारे काही चीनच्या पंखाखाली आणायचे आहे. यातून तैवानला त्यांनी लक्ष्य केले आहे. आपल्याकडे भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमारेषेवर कुरापती काढत असतानाच, दुसरीकडे अरुणाचल प्रदेशवरही वारंवार स्वामित्व सांगितले जात आहे. दक्षिण चीन समुद्रात त्या टापूतील छोट्या देशांच्या मच्छीमार नौका, आरमारांविरोधात अरेरावी सुरू आहे. हाँगकाँग खरे तर त्यांच्या पंखांखाली केव्हाच आलेला आहे. परंतु या व्यापारनगरीला ब्रिटनकडून चीनकडे हस्तांतरित केले जात असताना, हाँगकाँगला मर्यादित संविधान बहाल करण्यात आले होते. या संविधानाचा उद्देश हाँगकाँगवासीयांचे नागरी अधिकार सुरक्षित राखणे हा होता. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, माध्यमस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य अशा प्रकारचे अधिकार चीनमधील नागरिकांना आजही नाहीत. हाँगकाँग कित्येक वर्षे ब्रिटनच्या ताब्यात होते. त्यामुळे या भूमीत व्यापारी वृत्ती रुजली आणि लोकशाही रुळली. या दोहोंचा नायनाट करण्याचा चंग चीनच्या नेतृत्वाने बांधलेला दिसतो. लोकशाहीला असलेल्या धोक्यांविषयी येथील नागरिक वर्षानुवर्षे जागरूक होते. पण चिनी सरकारच्या वरवंट्याखाली हा विरोध पद्धतशीरपणे दडपण्यात आला. आज परिस्थिती अशी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा

## » औषधे खरेदी करण्याचे सरकारचे राज्यांना आदेश

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मागील काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रासह देशामध्ये क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने तातडीने क्षयरोगावरील औषधे खरेदीची प्रक्रिया सुरू केली. मात्र आजही फोर-एफडीसी आणि थ्री-एफडीसी या प्रकारातील औषधांचा साठा एक महिनाच पुरेल इतकाच उपलब्ध आहे.**



ही औषधे मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंत पुरेल इतकाच साठा असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध झाला नाही, तर केंद्र सरकारच्या 'क्षयरोगमुक्त भारत' योजनेला खीळ बसण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. असे असले तरी ही औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नसल्याने राज्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, ओरिसा, बिहार, छत्तीसगड या राज्यांसह संपूर्ण देशामध्ये काही महिन्यांपूर्वी क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. यासंदर्भात देशातील क्षयरोगविरोधी काम करणाऱ्या संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवला होता. त्याची दखल घेत केंद्र सरकारने 'क्षयरोग मुक्त भारत' हे अभियान अधिक सक्षमपणे राबविता यावे, यासाठी तातडीने क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी करण्यास सुरुवात केली. यासाठी राष्ट्रीय स्तरावर क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी प्रक्रिया सुरू केली. ही प्रक्रिया पूर्ण करून पुरवठादारांना खरेदी आदेशही जारी करण्यात आले.

मात्र फोर-एफडीसी आणि थ्री-एफडीसी या प्रकारातील औषधे राष्ट्रीय स्तरावर उपलब्धच नाहीत. तांत्रिक अडचणीमुळे या औषधांच्या पुरवठ्यास विलंब होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत केंद्र सरकारने ही औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करण्याच्या सूचना राज्य सरकारांना दिल्या आहेत. औषधे खरेदी करताना बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या व संलग्न घटकांची औषधे खरेदी करावी. तसेच मोफत औषधे पुरविणे शक्य होणार नसेल तर रुग्णाला औषधांच्या खर्चाची परतफेड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.क्षयरोग व एड्स यासंदर्भातील औषधांचा पुरवठा आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून केला जातो. त्यामुळे या औषधांची खरेदी केंद्र सरकारकडूनच करण्यात येते. काही पुरवठादार ही औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देत असले तरी त्यांना मर्यादा आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर ही औषधे खरेदी करणे राज्य सरकारांसाठी अवघड आहे. परिणामी स्थानिक पातळीवर औषधे उपलब्ध होणे अशक्य असल्याचे क्षयरोगविरोधी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.ही औषधे मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंत पुरेल इतकाच साठा असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध झाला नाही, तर केंद्र सरकारच्या 'क्षयरोगमुक्त भारत' योजनेला खीळ बसण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. असे असले तरी ही औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नसल्याने राज्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, ओरिसा, बिहार, छत्तीसगड या राज्यांसह संपूर्ण देशामध्ये काही महिन्यांपूर्वी क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता.

> “ महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, ओरिसा, बिहार, छत्तीसगड या राज्यांमध्ये क्षयरोगच्या औषधांच्या तुटवड्याला रुग्णांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच आता केंद्र सरकारने राज्य सरकारला स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परंतु ही औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नाहीत. तसेच एफडीसी प्रकारच्या औषधांचा साठा मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंतच पुरण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकारचा हा निर्णय क्षयरोग रुग्णांच्या जीवाशी खेळणारा आहे. यासंदर्भात पंतप्रधान कार्यालयाला देशातील क्षयरोगविरोधी कार्य करणाऱ्या संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत पत्र पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.
> – **गणेश आचार्य,** सामाजिक कार्यकर्ता

# देवेंद्र फडणवीसांनी मला तीन वाजता फोन केला

## » ओबीसीतून आरक्षण घेणारच असा पुनरुच्चार जरांगे यांनी केला

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे हे त्यांच्या सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीच्या मागणीवर ठाम आहेत. तसंच त्यांनी आता देवेंद्र फडणवीसांबाबत एक गौप्यस्फोट केला आहे. पहाटे तीन वाजता देवेंद्र फडणवीस यांनी मला फोन केला होता असं जरांगे यांनी म्हटलं आहे.**

इतकंच नाही तर आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे तोपर्यंत मी कायद्याचं पालन करतो आहे. पण मी शांत बसणार नाही. ओबीसीतून आरक्षण घेणारच असा पुनरुच्चार मनोज जरांगे यांनी केला आहे."आम्हाला जाणीवपूर्वक अडचणींत आणण्याचा प्रयत्न अनेकदा झाला. जाणीवपूर्वक मराठा समाजाचे कार्यक्रम होऊ द्यायचे नाहीत हे केलं गेलं. मात्र न्यायदेवतेनं आम्हाला न्याय दिला. खरंतर सरकारने ही भूमिका घ्यायला हवी होती. पण तसं झालं नाही. ज्या जनतेच्या जिवावर मोठे झाले तेच नेते आमच्यावर



अन्याय करतं आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही जबाबदारी आहे. आंदोलन, कार्यक्रम चार महिन्यांपूर्वी झाले त्याचे गुन्हे आत्ता दाखल केले जात आहेत. जेसीबी लावले त्याचे गुन्हे आत्ता दाखल करत आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच हे सगळं सुरु केलं आहे. माझ्या घराला तर नांदेडपासून नोटीस आली आहे. मी फुटणार नाही, हटणार नाही. कायद्याचं पालन करणार आहे. आदर्श आचारसंहिता आहे तोपर्यंत यांना पुन्हा सुख मिळतंय हरकत नाही. पण मी मराठ्यांना न्याय दिल्याशिवाय शांत बसणार नाही. " असं जरांगे यांनी म्हटलं आहे."माझ्या समाजाविषयी म्हणजेच मराठा समाजाविषयी द्वेष व्यक्त होतो आहे. आता बाकीच्या जाती-धर्माच्या लोकांनी सावध राहिलं पाहिजे. न्याय मिळाला पाहिजे म्हणून आम्ही लढतो आहोत. मात्र गृहमंत्र्यांचा द्वेष खूप भयंकर आहे. पोलीस करत आहेत असं सांगितलं जातं आहे. पण गृहमंत्री आमच्या विरोधात आकसाने वागत आहेत" असा आरोप मनोज जरांगेंनी केला आहे.

### काय म्हटलं आहे मनोज जरांगेंनी?

» पुढील महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला मदत करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.महाराष्ट्र निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी १४ तास दिल्लीत ताटकळत काढल्यानंतर मंगळवारी दुपारी साडेबारानंतर अखेर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली.

# आता न्यायालयाची ईडीला चपराक!

## आरोपींना खटल्याशिवाय डांबून ठेवणं चुकीचं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**निवडणूक रोखे आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर परखड भाष्य करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने आज एका प्रकरणात ईडीलाही खडे बोल सुनावले. एखाद्या आरोपीला खटला चालविल्याशिवाय डांबून ठेवणे हे स्वातंत्र्याला बाधा पोहोचवण्यासारखे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा कथित सहकारी असलेल्या प्रेम प्रकाश यांनी जामीनासाठी याचिका दाखल केली होती. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने मनी लॉंडरिंग प्रकरणामध्ये पुरवणी आरोपपत्रे दाखल करण्याच्या सक्तवसुली संचलनालयाच्या प्रथेविरुद्ध तीव्र नापसंती व्यक्त केली.**



प्रेम प्रकाश यांना ऑगस्ट २०२२ रोजी अटक करण्यात आले होते. त्यांच्या रांची येथील ठिकाणांवर टाकलेल्या धाडीमध्ये दोन एके ४७ बंदुका, ६० जिवंत काडतुसे आढळून आल्याचे सांगण्यात आले. प्रेम प्रकाश यांच्याविरोधात मनी लॉंडरिंग आणि बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. झारखंडमधील अवैध खाणकामाबद्दल दाखल केलेल्या मनी लॉंडरिंग प्रकरणात ईडीने चार पुरवणी आरोपपत्र दाखल केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने आक्षेप नोंदवला. चार पुरवणी आरोपपत्र दाखल करूनही या प्रकरणाचा अद्याप तपास सुरूच आहे का? असा प्रश्न खंडपीठाने ईडीतर्फे बाजू मांडणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांना विचारला. खंडपीठाने राजू यांना पुढे सांगितले, "आम्ही तुम्हाला लक्षात आणू देऊ इच्छितो, कायद्यानुसार एखाद्या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करता येत नाही. खटला सुरू झाल्याशिवाय एखाद्या व्यक्तीला कोठडीत ठेवता येत नाही. ही पद्धत म्हणजे एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्यासारखी आहे. त्यामुळे त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर परिणाम होतो. काही प्रकरणांमध्ये आम्हाला यात लक्ष घालावे लागेल."न्या. खन्ना म्हणाले की, याचिकाकर्ते मागच्या १८ महिन्यांपासून कारावासात आहेत. त्यानंतर एकामागोमाग पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात येत आहेत. ज्यामुळे खटला सुरू होण्यास विलंब होत आहे. ते पुढे म्हणाले, "डीफॉल्ट जामीनचा अर्थच असा आहे की, जर तुम्ही वेळेत तपास पूर्ण करत नसाल तर तोपर्यंत आरोपीला अटक करता येत नाही. तपास पूर्ण होईपर्यंत खठला सुरूच होणार नाही, असे तुम्ही सांगू शकत नाही.

"झारखंडमधील अवैध खाणकामाबद्दल दाखल केलेल्या मनी लॉंडरिंग प्रकरणात ईडीने चार पुरवणी आरोपपत्र दाखल केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने आक्षेप नोंदवला. चार पुरवणी आरोपपत्र दाखल करूनही या प्रकरणाचा अद्याप तपास सुरूच आहे का? असा प्रश्न खंडपीठाने ईडीतर्फे बाजू मांडणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांना विचारला. खंडपीठाने राजू यांना पुढे सांगितले, "आम्ही तुम्हाला लक्षात आणू देऊ इच्छितो, कायद्यानुसार एखाद्या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करता येत नाही. खटला सुरू झाल्याशिवाय एखाद्या व्यक्तीला कोठडीत ठेवता येत नाही. ही पद्धत म्हणजे एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्यासारखी आहे. त्यामुळे त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर परिणाम होतो. काही प्रकरणांमध्ये आम्हाला यात लक्ष घालावे लागेल.

### स्वातंत्र्याला बाधा पोहोचवण्यासारखे

"निवडणूक रोखे आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर परखड भाष्य करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने आज एका प्रकरणात ईडीलाही खडे बोल सुनावले. एखाद्या आरोपीला खटला चालविल्याशिवाय डांबून ठेवणे हे स्वातंत्र्याला बाधा पोहोचवण्यासारखे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. खंडपीठाने राजू यांना पुढे सांगितले, "आम्ही तुम्हाला लक्षात आणू देऊ इच्छितो, कायद्यानुसार एखाद्या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करता येत नाही. खटला सुरू झाल्याशिवाय एखाद्या व्यक्तीला कोठडीत ठेवता येत नाही. ही पद्धत म्हणजे एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्यासारखी आहे. त्यामुळे त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर परिणाम होतो. काही प्रकरणांमध्ये आम्हाला यात लक्ष घालावे लागेल. माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा कथित सहकारी असलेल्या प्रेम प्रकाश यांनी जामीनासाठी याचिका दाखल केली होती. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने मनी लॉंडरिंग प्रकरणामध्ये पुरवणी आरोपपत्रे दाखल करण्याच्या सक्तवसुली संचलनालयाच्या प्रथेविरुद्ध तीव्र नापसंती व्यक्त केली निवडणूक रोखे आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर परखड भाष्य करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने आज एका प्रकरणात ईडीलाही खडे बोल सुनावले.

# 90 दशकातील गोड गळ्याचा ओसामा बिन लादेनही होता चाहता

## अलका याज्ञिक यांनी 25 भाषांमध्ये जवळपास 2100 गाणी गायली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बॉलिवूडमध्ये अनेक कलाकारांनी आपल्या कामाची छाप सोडली आहे. त्यातील काहींनी तर सिनेसृष्टीत इतिहास रचला आहे. भारतीय सिनेसृष्टीत ऐंशीच्या दशकात आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या अलका याज्ञिक यांनीदेखील आपला ठसा उमटवला आहे. त्यांनी गायलेली अनेक गाणी आजही लोकप्रिय आहे. अलका याज्ञिक यांना 'क्वीन ऑफ प्लेबॅक सिंगिंग असेही म्हटले जाते.**

रिपोर्ट्सनुसार, अलका याज्ञिक यांनी 25 भाषांमध्ये जवळपास 2100 गाणी गायली आहेत. अलका याज्ञिक यांनी किशोर कुमार आणि मोहम्मद रफी यांच्यासोबतही गाणी गायली आहेत. त्यांनी सूराची जादू अजूनही कायम असून संगीतप्रेमींच्या मनात त्यांनी स्थान मिळवले आहे. 20 मार्च 1966 रोजी कोलकाता येथे जन्मलेल्या अलका याज्ञिक या गुजराती कुटुंबातील आहेत. त्यांची आई शुभा या शास्त्रीय गायिका होत्या. वयाच्या 6 व्या वर्षी अलका यांना कोलकात्याच्या आकाशवाणीमध्ये गाण्याची संधी मिळाली. अलका येथे भजने गात असे. तिने जवळपास चार वर्षे त्यांनी आकाशवाणीवर भजने गायली. वयाच्या 10 व्या वर्षी



त्यांची आई त्यांना मुंबईत घेऊन आली. मुंबईत आल्यानंतर अलका याज्ञिकच्या आईने त्यांना आवाज सुधारण्यासाठी खूप मदत केली. अलका याज्ञिक यांना राज कपूर यांच्या कार्यालयातून एक पत्र आले ज्यामध्ये तिला गाण्याची ऑफर देण्यात आली होती. एका वृत्तानुसार, अलकाचा आवाज राज कपूर यांनी ऐकला होता आणि त्यांना आवडला. त्यांनी संगीतकार लक्ष्मीकांत यांना अलका याज्ञिकबद्दलचे एक पत्र पाठवले. लक्ष्मीकांत यांनादेखील अलका याज्ञिक यांचा आवाज आवडला. अलका याज्ञिकचे पहिले गाणे 'पायल की झंकार' (1980) चित्रपटातील 'थिरकत अंग' होते. लक्ष्मीकांत यांनी हे गीत संगीतबद्ध केले होते. यानंतर त्यांनी लावरिस (1981) चित्रपटातील 'मेरे अंगने में' हे सुपरहिट गाणे गायले. पुढच्या वर्षी त्यांनी 'हमारी बहू अलका' चित्रपटातील 'हम तुम रहेंगे अकेले' हे गाणे गायले.1988 मध्ये प्रदर्शित झालेल्या तेजाब चित्रपटातील एक दोन तीन हे गाणं चांगलंच गाजलं. अलका याज्ञिक यांचे हे गाणं ब्लॉकबस्टर गाणं ठरलं. या गाण्याने लोकप्रियतेचे शिखर गाठले. आजही या गाण्याची लोकप्रियता कायम आहे.

### किशोर कुमारसोबत 10 गाणी

या गाण्यासाठी अलका याज्ञिकला सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिकेचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. यानंतर अलका याज्ञिकने 'चोली के पीचे क्या है', 'मुझको राणा जी', 'चुरा के दिल मेरा', 'मेरा दिल भी कितना', 'लडकी बडी अंजनी है', 'तुम तो धोकेबाज', 'एक दिनआप युं' सारखी अनेक सुपरहिट गाणी अलका याज्ञिकने गाणी गायली आहेत. अलका याज्ञिक यांनी हिंदी व्यतिरिक्त बंगाली, गुजराती, मल्याळम, मराठी, भोजपुरी, तमिळ, तेलगू, ओरिया अशा सुमारे 25 भाषांमध्ये 2000 हून अधिक गाणी गायली आहेत. अलका याज्ञिकने किशोर कुमारसोबत जवळपास 10 गाणी गायली.

# "लीक कर दू क्या"; बॉबी देओलकडे आहे धोनीचा 'हा' व्हिडीओ

बॉलीवूड सुपरस्टार बॉबी देओलने 'ॲनिमल' चित्रपटाद्वारे पुन्हा एकदा दमदार एन्ट्री केली. या चित्रपटातील 'जमाल कुडू' या गाण्यावर बॉबी देओल डोक्यावर दारूचा ग्लास घेत थिरकताना दिसला तेव्हा हे गाणं खूप व्हायरल झालं होतं. अशातचं बॉबी देओलची एक्सवरील पोस्ट आता व्हायरल होतेय. यात बॉबी देओलने क्रिकेटर महेंद्रसिंग धोनीच्या मेसेजचा स्क्रिनशॉट शेअर केला आहे. ज्यात एम एस धोनी बॉबी देओलला एका गोष्टीची विनंती करताना दिसतोय.एम.एस. धोनीचा उल्लेख करत बॉबी देओलने त्याच्या एक्स अकाउंटवरून एक ट्वीट शेअर केलं आहे. त्या ट्वीटमध्ये त्याने एक फोटो पोस्ट केलेला दिसत आहे. व्हॉट्सअॅप



नोटिफिकेशन असलेल्या या फोटोत धोनी भाई अशा नावाने एक मेसेज आल्याचे दिसत आहे. "बॉबी, तो माझा व्हिडीओ कृपया करून डिलीट कर ना... खूपच लाजिरवाणा आहे", असे त्यात म्हटल्याचं दिसत आहे. यावर बॉबी देओलने देखील उत्तर दिले आहे.बॉबीने या पोस्टबरोबर हटके कॅप्शनही दिलं आहे. "माही भावा, ठीक आहे मी डिलीट करतो", असे बॉबी देओलने म्हटले आहे. त्यासोबतच "लीक कर दू क्या" असे हॅशटॅग्स बॉबीने वापरले आहेत.बॉबीच्या या व्हायरल एक्स पोस्टवरून नेटकरी विचारत पडले आहेत. नक्की कोणत्या व्हिडीओबद्दल बॉबी आणि धोनी चर्चा करत आहेत? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. या पोस्टवर अनेकांनी मजेशीर कमेंट्स करत या व्हिडीओबाबत विचारणा केली आहे. एकाने कमेंट करत लिहिले, "बॉबी भाऊ तुम्ही तर हॅकर निघालात.

# मी माफी मागणार नाही

अभिनेत्री सारा अली खानची आई अमृता सिंह हिंदू आहे, तर तिचे वडील सैफ अली खान मुस्लीम आहेत. सारा तिचं पूर्ण नाव सारा अली खान असं लिहिते, तसेच मंदिरांमध्ये जाते, यावरून तिला बऱ्याचदा टीकेचा सामना करावा लागतो. आता साराने एका मुलाखतीत तिच्या कुटुंबाबद्दल विधान केलं आहे. एका धर्मनिरपेक्ष कुटुंबात जन्म झाला, त्यामुळे ज्या गोष्टी चुकीच्या आहेत, त्याविरोधात मी बोलते. पण अनावश्यक ठिकाणी बोलायला आवडत नाही, असं साराने सांगितलं. लोक तिच्या धर्मावरून टीका करतात, प्रश्न विचारतात याबद्दलही अभिनेत्रीने तिचं मत मांडलं. 'गॅलाटा इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत सारा म्हणाली, "मी एका धर्मनिरपेक्ष कुटुंबात आणि एका सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही असलेल्या देशात जन्मले. मला कधी अन्यायाविरोधात बोलायची गरज भासली नाही, कारण मला अनावश्यक बोलायला आवडत नाही. जे चुकीचं आहे त्याविरुद्ध उभं राहून बोलण्याची हिंमत माझ्यात आहे. त्यामुळे माझ्याबरोबर किंवा माझ्या आजूबाजूच्या कोणाशीही काही चुकीचं घडत असल्याचं मला दिसलं तर मी त्याबद्दल बोलेन."लोकांना जेव्हा तिने केलेलं काम आवडत नाही तेव्हा त्याचा त्रास होतो, पण वैयक्तिक गोष्टींबद्दल, धार्मिक श्रद्धांबद्दल तिला कोणीही काहीही म्हटलं तर फरक पडत नाही, कारण ते तिचे निर्णय आहेत, असं साराने सांगितलं. आडनाव आणि कुटुंबाबद्दल विचारलं असता सारा म्हणाली, "माझ्या धार्मिक श्रद्धा, माझ्या खाण्या-पिण्याच्या आवडी, विमानतळावर कसं जायचं, ते निर्णय माझे आहेत. त्यामुळे त्यासंदर्भात काहीही असेल तर मी कधीच माफी मागणार नाही.



# लेकीसह अयोध्येला पोहोचली प्रियांका

ग्लोबल स्टार प्रियांका चोप्रा गेल्या आठवड्यात एका कार्यक्रमानिमित्त लेक मालतीसह भारतात दाखल झाली होती. तिच्या पाठोपाठ निक जोनस देखील मुंबईत आला होता. मुंबई विमानतळावर प्रियांकाच्या नवऱ्याचं जोरदार स्वागत करण्यात आलं होतं. आता हे संपूर्ण कुटुंबीय अयोध्येला पोहोचलं आहे. प्रियांकाने अयोध्येत दर्शन घेतल्याचा आणि विमानतळावरुन बाहेर पडतानाचा व्हिडीओ एएनआयवरून शेअर करण्यात आला आहे. यावेळी अभिनेत्रीबरोबर तिची आई देखील उपस्थित होती.जानेवारी महिन्यात अयोध्येत श्री राम मंदिरात रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला होता. यावेळी प्रियांका चोप्रा गैरहजर होती. तिच्याशिवाय या सोहळ्याला अमिताभ बच्चन, रणबीर कपूर, आलिया भट्ट, विकी कौशल, कतरिना कैफ, रजनीकांत, अभिषेक बच्चन यांच्यासह अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती.दरम्यान, गेल्या आठवड्यात एका कार्यक्रमानिमित्त अभिनेत्री भारतात आली होती. निक आल्यानंतर या दोघांनी जोडीने रितेश सिधवानीच्या पार्टीला हजेरी लावली होती. दरम्यान, लवकरच प्रियांका फरहानच्या 'जी ले जरा' चित्रपटात झळकण्याची शक्यता आहे.

ग्लोबल स्टार प्रियांका चोप्रा गेल्या आठवड्यात एका कार्यक्रमानिमित्त लेक मालतीसह भारतात दाखल झाली होती. तिच्या पाठोपाठ निक जोनस देखील मुंबईत आला होता. मुंबई विमानतळावर प्रियांकाच्या नवऱ्याचं जोरदार स्वागत करण्यात आलं होतं. आता हे संपूर्ण कुटुंबीय अयोध्येला पोहोचलं आहे. प्रियांकाने अयोध्येत दर्शन घेतल्याचा आणि विमानतळावरुन बाहेर पडतानाचा व्हिडीओ एएनआयवरून शेअर करण्यात आला आहे. यावेळी अभिनेत्रीबरोबर तिची आई देखील उपस्थित होती.जानेवारी महिन्यात अयोध्येत श्री राम मंदिरात रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला होता.

# राम -जान्हवी कपूर ही नवी जोडी रुपेरी पडद्यावर



अभिनेत्री जान्हवी कपूर बॉलीवूडनंतर आता दाक्षिणात्य सिनेसृष्टीत पाऊल ठेवण्यासाठी सज्ज झाली आहे. दाक्षिणात्य सिनेसृष्टीत नशीब आजमावणाऱ्या जान्हवीकडे आता दोन मोठे चित्रपट आहेत. एक म्हणजे 'देवरा' आणि दुसरा 'आरसी १६'. या चित्रपटामध्ये जान्हवी दाक्षिणात्य सुपरस्टार्ससह झळकणार आहे. नुकतंच जान्हवीच्या आगामी, बहुचर्चित 'आरसी १६' या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला. याचे व्हिडीओ, फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. ६ मार्चला जान्हवी कपूरच्या वाढदिवसाच्या दिवशी निर्मात्यांनी ती 'आरसी १६' चित्रपटात झळकणार असल्याची घोषणा केली होती. तेव्हापासून तिच्या चाहत्यांना या चित्रपटाविषयी उत्सुकता लागली आहे. नुकताच 'आरसी १६' चित्रपटाचा मुहूर्त सोहळा आयोजित केला होता. या सोहळ्यासाठी दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील काही स्टार्स आपल्या कुटुंबियांसह उपस्थित राहिले होते. 'आरसी १६' या चित्रपटात जान्हवीसह झळकणारा राम चरण आपल्या कुटुंबासह या सोहळ्याला पोहोचला होता. शिवाय मेगास्टार चिरंजीवी देखील पाहायला मिळाले. तसेच सुप्रसिद्ध संगीतकार ए.आर रेहमान यांनी सुद्धा हजेरी लावली होती. या सोहळ्याचे सध्या व्हिडीओ, फोटो चांगलेच चर्चेत आले होते. या सोहळ्यासाठी राम चरणने पारंपरिक लूक केला होता. धोती आणि कुर्तामध्ये राम पाहायला मिळाला.

# रोहित शर्मा शेकहँड करायला गेला!

## इंडियाचा कर्णधार आयपीएलमध्ये खेळाडू म्हणून दिसणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएलच्या 17 व्या हंगामाला 22 मार्चपासून सुरु होणार आहे. चेन्नई आणि आरसीबी यांच्यामध्ये सलामीची लढत होणार आहे. मुंबई इंडियन्सचा पहिला सामना गुजरातविरोधात होणार आहे. या हंगामात मुंबईचं कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे सोपवण्यात आले आहे.रोहित शर्माची हाकालपट्टी करत हार्दिककडे धुरा सोपवल्यानंतर चाहत्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. त्याशिवाय अनेक माजी खेळाडूंनीही मुंबईच्या निर्णयावर बोट ठेवलं होतं. आयपीएलमध्ये रोहित शर्मा खेळणार का? असा प्रश्नही उपस्थित झाला होता. रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्याची भेट होईल तेव्हा काय होईल? असा प्रश्नही चाहत्यांना सतावत होता. मुंबई इंडियन्सच्या सराव सत्रात आजी आणि माजी खेळाडूंची भेट झाली, त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.**



मुंबई इंडियन्सच्या सराव सत्रात रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांची भेट झाली. या भेटीवेळचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. रोहित शर्माला पाहिल्यानंतर हार्दिक पांड्या त्याच्याकडे गेला... हार्दिक पांड्या आल्याचं पाहिल्यानंतर रोहित शर्मा शेकहँड करायला गेला. पण हार्दिक पांड्यानं रोहित शर्माच्या गळ्यात गळा घातला. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. यावर समिश्र प्रतिक्रिया येत आहेत. काहींनी ही दोस्ती तुटायची नाही, असं म्हटलेय. तर काहींनी याबाबत नकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. आयपीएल 2024 आधी कर्णधार म्हणून मुंबईने रोहित शर्माच्या जागी आता हार्दिक पांड्याची निवड केली. मगील 17 वर्षांच्या इतिहासामध्ये पहिल्यंदाच टीम इंडियाचा कर्णधार आयपीएलमध्ये खेळाडू म्हणून दिसणार आहे. रोहित शर्माला कर्णधारपदावरुन काढल्याचा फटका मुंबईला बसलाय. सोशल मीडियावरुन त्यांचे फॉलोअर्स कमी झाले. त्याशिवाय चाहत्यांमध्येही प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात येतेय. आयपीएल 2024 आधी मिनी लिलाव पार पडला होता. त्याआधीच मुंबईने ट्रेड विंडोद्वारे हार्दिक पांड्याला कॅश डीलमध्ये आपल्या ताफ्यात घेतले. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातने दोन वर्षांत शानदार कामगिरी केली होती. गुजरातने 2022 आणि 2023 मध्ये फायनलमध्ये धडक मारली होती. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातला जेतेपदही मिळालं होतं. त्यामुळेच मुंबईने हार्दिक पांड्याची आयात केली. त्यानंतर त्याच्याकडे कर्णधारपद सोपवलं. आयपीएलच्या 17 व्या हंगामाला 22 मार्चपासून सुरु होणार आहे. चेन्नई आणि आरसीबी यांच्यामध्ये सलामीची लढत होणार आहे. मुंबई इंडियन्सचा पहिला सामना गुजरातविरोधात होणार आहे. या हंगामात मुंबईचं कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे सोपवण्यात आले आहे.रोहित शर्माची हाकालपट्टी करत हार्दिककडे धुरा सोपवल्यानंतर चाहत्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. त्याशिवाय अनेक माजी खेळाडूंनीही मुंबईच्या निर्णयावर बोट ठेवलं होतं. आयपीएलमध्ये रोहित शर्मा खेळणार का? असा प्रश्नही उपस्थित झाला होता. रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्याची भेट होईल तेव्हा काय होईल? असा प्रश्नही चाहत्यांना सतावत होता. मुंबई इंडियन्सच्या सराव सत्रात आजी आणि माजी खेळाडूंची भेट झाली, त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. मुंबई इंडियन्सच्या सराव सत्रात रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांची भेट झाली. या भेटीवेळचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय.

### चाहत्यांकडून नाराजी व्यक्त

रोहित शर्माला कर्णधारपदावरुन काढल्याचा फटका मुंबईला बसलाय. सोशल मीडियावरुन त्यांचे फॉलोअर्स कमी झाले. त्याशिवाय चाहत्यांमध्येही प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात येतेय. आयपीएल 2024 आधी मिनी लिलाव पार पडला होता. त्याआधीच मुंबईने ट्रेड विंडोद्वारे हार्दिक पांड्याला कॅश डीलमध्ये आपल्या ताफ्यात घेतले. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातने दोन वर्षांत शानदार कामगिरी केली होती. गुजरातने 2022 आणि 2023 मध्ये फायनलमध्ये धडक मारली होती. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातला जेतेपदही मिळालं होतं. त्यामुळेच मुंबईने हार्दिक पांड्याची आयात केली. त्यानंतर त्याच्याकडे कर्णधारपद सोपवलं. आयपीएलच्या 17 व्या हंगामाला 22 मार्चपासून सुरु होणार आहे. या हंगामात मुंबईचं कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे सोपवण्यात आले आहे.रोहित शर्माची हाकालपट्टी करत हार्दिककडे धुरा सोपवल्यानंतर चाहत्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

# प्लीज मला किंग म्हणू नका कारण..!

## मला यामुळे खूपच विचित्र वाटतं : विराट कोहलीचे चाहत्यांना आवाहन

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विराट कोहलीने आरसीबीच्या अनबॉक्स कार्यक्रमात त्याला 'किंग' म्हणू नका अशी आपल्या चाहत्यांना विनंती केली. कोहलीचे चाहते त्याला 'किंग कोहली' म्हणतात, पण या स्टार फलंदाजाला हे नाव विचित्र वाटते. आरसीबी अनबॉक्स कार्यक्रमादरम्यान कोहलीने त्याच्या चाहत्यांना खास आवाहन केले. त्याने कार्यक्रमाचे सूत्रधार दानिश सैत आणि चाहत्यांना त्याला किंग म्हणू नका, मला यामुळे खूपच विचित्र वाटतं असे सांगितले.**



१९ मार्चला बंगळुरू संघाचा चिन्नास्वामी स्टेडियमवर आरसीबी अनबॉक्स नावाचा मोठा सोहळा पार पडला. याच कार्यक्रमात संघाने आपले नाव बदलून ROYAL CHALLENGERS BENGALURU असे केले. तर आयपीएल २०२४ साठीच्या नव्या जर्सीचे अनावरण केले. पण तत्पूर्वी महिला प्रीमियर लीग २०२४ चा महिला विजेता आरसीबी संघाचे स्वागत केले. यानंतर विराटने चाहत्यांशी संवाद साधला. विराटने चाहत्यांशी संवाद साधायला माईक घेतला आणि एकच विराटच्या नावाचा आवाज दुमदुमला. यादरम्यान बोलताना विराटने सर्वांना विनंती करत सांगितले की,मला किंग म्हणू नका. विराट म्हणाला, "सर्वप्रथम तर तुम्ही मला त्या नावाने (किंग) हाक मारणं थांबवा. कृपया मला विराट म्हणा. पण त्या नावाने (किंग) हाक मारू नका. मी आताच फाफ डु प्लेसिससोबत बोलत होतो की तुम्ही जेव्हा जेव्हा या नावाचा माझ्यासाठी उल्लेख करता तेव्हा मला खूप विचित्र वाटतं. आता यापुढे मला विराटचं म्हणा. पुन्हा ते नाव (किंग) नको. ते ऐकल्यावर खूप ओशाळल्यासारखं वाटतं."आरसीबीचा संघ आयपीएल २०२४ च्या पहिल्याच सामन्यातून आपल्या मोहिमेला सुरूवात करणार आहे.

### आरसीबी अनबॉक्स नावाचा सोहळा

चेन्नई सुपर किंग्जविरूध्दच्या पहिल्या सामन्यासाठी आरसीबीचा संघ चेन्नईमध्ये दाखल झाला आहे.२२ मार्चला त्यांचा पहिला सामना धोनीच्या चेन्नई संघासोबत रात्री ८ वाजता असणार आहे.विराट कोहलीने आरसीबीच्या अनबॉक्स कार्यक्रमात त्याला 'किंग' म्हणू नका अशी आपल्या चाहत्यांना विनंती केली. कोहलीचे चाहते त्याला 'किंग कोहली' म्हणतात, पण या स्टार फलंदाजाला हे नाव विचित्र वाटते. आरसीबी अनबॉक्स कार्यक्रमादरम्यान कोहलीने त्याच्या चाहत्यांना खास आवाहन केले. त्याने कार्यक्रमाचे सूत्रधार दानिश सैत आणि चाहत्यांना त्याला किंग म्हणू नका, मला यामुळे खूपच विचित्र वाटतं असे सांगितले. १९ मार्चला बंगळुरू संघाचा चिन्नास्वामी स्टेडियमवर आरसीबी अनबॉक्स नावाचा मोठा सोहळा पार पडला.